RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक १७६(६)] मंगळवार, डिसेंबर १६, २०२५/अग्रहायण २५, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ५७८**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### नियोजन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ डिसेंबर २०२५.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेप्रनि-२०२३/प्र.क्र. १०१/का. १४२६.— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेले अधिकार आणि यासंदर्भात त्यास सक्षम करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील राजपत्रित अधिकारी (गट-अ आणि गट-ब) सेवाप्रवेश नियम, २०२४ मध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

**१.** या नियमांना अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील राजपत्रित अधिकारी (गट-अ आणि गट-ब) सेवाप्रवेश (सुधारणा) नियम, २०२५ असे संबोधण्यात यावे.

**२.** अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील राजपत्रित अधिकारी (गट-अ आणि गट-ब) (सेवाप्रवेश) नियम, २०२४ (यापुढे " मुख्य नियम " म्हणून उल्लेख केला जाईल) मधील नियम क्र. ३ मध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या तरतुदीऐवजी पुढील तरतूद दाखल करण्यात येत आहे.

" परंतु असे की, अपर संचालक पद धारण करणारी व त्या पदावर तीन वर्ष सलग नियमित सेवा झालेली व्यक्ती उपलब्ध न झाल्यास, अपर संचालक पदावर १ वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा झालेल्या आणि अपर संचालक व सहसंचालक पदावर मिळून एकत्रित किमान आठ वर्ष नियमित सेवा झालेल्या व्यक्तीमधून ज्येष्ठतेनुसार सुयोग्य व्यक्तीची संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय पदावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल. "

**३.** मुख्य नियमातील नियम क्र. ५ मध्ये " वरिष्ठ संशोधन अधिकारी " या शब्दांनंतर " / जिल्हा नियोजन अधिकारी " या शब्दांचा समावेश करण्यात येत आहे.

**४.** मुख्य नियमातील नियम क्र. ६ मध्ये,—

i. " वरिष्ठ संशोधन अधिकारी " या शब्दांनंतर " / जिल्हा नियोजन अधिकारी " या शब्दांचा समावेश करण्यात येत आहे.

ii. उप-नियम (१) मध्ये, " सांख्यिकी अधिकारी (निरीक्षण) " या शब्दांनंतर " / सहायक जिल्हा नियोजन अधिकारी " या शब्दांचा समावेश करण्यात येत आहे.

iii. उप-नियम (२)(क) मध्ये " पाच वर्षे " या शब्दांच्या जागी " तीन वर्षे " या शब्दांचा समावेश करण्यात येत आहे.

**५.** मुख्य नियमातील नियम क्र. ७ मध्ये " सांख्यिकी अधिकारी (निरीक्षण) " या शब्दांनंतर " / सहायक जिल्हा नियोजन अधिकारी " या शब्दांचा समावेश करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**चारुशीला चौधरी**,
शासनाचे सहसचिव.

## PLANNING DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 16th December 2025.

*NOTIFICATION*

Constitution of India.

No. Seprani-2023/C.R. 101/Desk-1426.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and of all other powers enabling it in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Gazetted Officers (Group A and Group B) in the Directorate of Economics and Statistics (Recruitment) Rules, 2024 as follows, namely :—

**1.** These rules may be called Gazetted Officers (Group-A and Group-B) in the Directorate of Economics and Statistics (Recruitment) (Amendment) Rules, 2025.

**2.** In rule 3 of the Gazetted Officers (Group A and Group B) in the Directorate of Economics and Statistics (Recruitment) Rules, 2024 (hereinafter referred to as "the principal rules") for the existing proviso the following proviso shall be substituted, namely :—

"Provided that, where a suitable person holding the post of the Additional Director having not less than three years of regular and continuous service on that post is not available, then a suitable person on the basis of seniority having not less than one year of regular and continuous service on the post of the Additional Director and having not less than eight years of a regular and continuous service on the post of Additional Director and Joint Director collectively in the Directorate, shall be appointed to the post of the Director, Directorate of Economics and Statistics."

**3.** In rule 5 of the principal rules, after the words "Senior Research Officer" the words "or District Planning Officer" shall be inserted.

**4.** In rule 6 of the principal rules,—

(i) after the words "Senior Research Officer" the words "or District Planning Officer" shall be inserted.

(ii) in sub-rule (I), after the words "Statistical Officer (Inspection)" the words "or Assistant District Planning Officer" shall be inserted.

(iii) in sub-rule (2), in clause (c), for the words "five years" the words "three years" shall be substituted.

**5.** In rule 7 of the principal rules, after the words "Statistical Officer (Inspection)" the words "or Assistant District Planning Officer" shall be inserted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

CHARUSHILA CHAUDHARI,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.